# आनंदभोग मॉल

आशुतोष पोतदार

## पात्रे

तो आणि ती: दोघेही त्यांच्या वयाच्या तिशीत.

## दृष्य दुसरे

(ती वर्तमानपत्र वाचतेय. पेपरवर काही खुणा करतेय. नोंदी करुन घेते. तो बाहेरुन येताना दिसतो. तिच्याकडे पाहातो. तिच्या पाठीशी बसतो. तिला जवळ घेतो. ती लाडाने सुटका करुन घेण्याचा प्रयत्न करते. तो तिच्या केसात हात फ़िरवत बोलतोय.)

ती: (लाडाने सुटका करुन घेत) मला काम करु दे

तो: किती काम करशील.

ती: हं. (तो तिच्या वाचण्यात काहीतरी रोमँटिक गम्मत आणुन अडथळा आणण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या पासुन ती सुटका करुन घेते) चहा करु?

तो: मेडिकल असोसिएशन मधे घेऊन आलोय.

ती: अर्धा कप?

तो: (सौम्य हसत) नको. (बुट काढत) तुझं काय चाल्लय?

ती: अ‍ॅड्स बघतेय. (पेपरमधे दाखवत) ही बघ ही साईट कशी वाटते? मागं किती झाडी आहे बघ.

तो: फ्लॅट घ्यायचं आगदी मनावर घेतलेलं दिसतयस.

ती: (ते पेपरचे पान बाजुला ठेवत) मागच्या वर्षी किती टॅक्स गेला. लौकर कर्ज काढलं तर लौकर फिटेलही.

तो: म्हंजे इथचं राहायचं?

ती: (पेपर आवरत) मग कुठं जायचं?

तो: तुच म्हणतीस की पुण्याला जाऊया.

ती: वाटतं रे. पण मग आणि वाटतं, माझी इथली परमनंट नोकरी, तुझी प्रॅक्टिस. पुण्यात हे सगळं थोडच मिळणाराय. आणि शिवाय आई बाबांचं काय करायचं हा प्रश्न आहेच. (ती एकदम शांत)

तो:	त्यात कायाय यवढं. त्यांनाही न्यायचं आपल्या बरोबर.

(शांतता)

ती:	ते कुठले येतायत आपल्या बरोबर गांव सोडुन.

तो:	घेऊन जायचं.

ती:	सगळं कॉम्प्लिकेटेड. शिवाय, लांब गेल्यावर प्रॉपर्टी कॉम्प्लिकेशन्स. राहु दे पुण्याचं. कसही आसलं तरी राहु इथच. आणि, आता इथं किती वेगवेगळ्या कम्पन्या येतायत. जागेचे भाव वर चालेत. (पेपर मधली ॲड वाचत) हे बघ, 'आशियाना रेसिडन्सी', प्रशस्त परिसर, स्विमिंग टँक, शहराच्या मधोमध. जिम सुध्दा आहे इथं. शाळा कॉलेज दाहा मिन्टांच्या आंतरावर.

तो:	कुठली रेसिडन्सी?

ती:	आशियाना.

तो:	मोहमेडन दिसतोय.

ती:	कशावरुन?

तो:	नावावरनं.

ती:	हट.

तो:	जाहिरातीत हिरवा रंगाय?

ती:	इथं तसलं काही नाही.

तो:	तिथं नसेल. पण, पलिकडच्या चौकातल्या घराचे नांव नाही आशियाना मंझिल?

ती:	पण म्हणुन फक्त मुसलमानच घराला असलं नाव देतात आसं नाही.

तो:	ते पण आहे म्हणा. पण, मोहमेडन कुठं कॉन्ट्रॅक्टर आसतात.

ती:	ते बरोबरय. पण रिस्क नको घ्यायला.

तो:	एकदम विचारपुर्वक सुरुय सगळं.

ती:	अपार्टमेंटचं नांव कसं आसायला पाहयजे... व्यंकटेश विला, गणेश अपार्टमेंट नाही तर महालक्ष्मी टॉवर्स.

तो:	(तो पण पुढे होतो आणि पहातो) हे बघ, (दाखवत) ड्रीम पार्क-संपुर्ण कुटुंबासाठी परिपूर्ण, घर नव्हे स्वर्ग, 3/2 बी एच के, प्रशस्त पार्किंग.

ती:	वाव! मग, वास्तुशास्त्राचे नियम?

तो:	त्यात काय बघायचं आसतय यवढं?

ती:	शास्त्र आहे ते.

तो:	काय शास्त्रय त्यात!

ती:	मॉदेवी म्हणतात विश्वास ठेऊन करतो ते सारे शास्त्र!

तो:	(उपहासाने) जय मॉदेवी! (विषय बदलत) पण मला सांग, आपण टु. बी. एच. के. फ्लॅटमधेच राहायचं?

ती:	त्यवढ तरी नको? आपल्यासाठी आणि आपल्या एका मुलासाठी.

तो:	एकच मुल?

ती:	म्हंजे?

तो:	थ्री बी एच के बघुया. दोन मुलं पाहिजेत.

ती:	ये बाबा.

तो:	एक मुलगा आणि मुलगी असली की घरात बॅलन्स आसतो.

ती:	मोठा महत्वाकांक्षी आहेस

तो:	माझ्या आईला दोन मुली त्यावर आम्ही दोघे.

ती:	सॅल्युट तुझ्या आईला.

तो:	(लाडात येत) दोन मुलं पाहिजेतच.

ती:	मुलांचं नंतर बघु. आधी फ़्लॅट.

तो:	(स्वतःशीच) आपल्या पोरांवर संस्कार व्हायला पाहिजेत. (तिच्या कडे बघत कौतुकाने सांगतो) आमच्या आण्णांची जिथं-जिथं बदली व्हायची तिथं ते ब्राह्मण शेजार बघायचे. (स्मित हास्य करत) संस्कार चांगले होतात म्हणायचे.

ती:	म्हणुन माझा शेजार काय?

(तो हसतो)

पण, एकदा सांग तरी, माझ्या प्रेमात का पडलास ते.

तो:	ये आता झालय की सगळं रामायण.

ती:	(लाडात) नाही एकदा सांग.

तो:	(प्रेमाने) तु आवडायचीस.

ती:	का?

तो:	आता का विचारतेयस?

ती:	आसच.

तो:	(विचार करत) छान दिसतेस म्हणुन आवडायचीस.

ती:	आणि?

तो:	गोड बोलायचीस.

ती:	म्हंजे कशी?

तो:	आता कसं सांगु? किती दिवस झाले!

ती:	(प्रेमाने) म्हणुन काय ते विसरणारायस?

तो:	कसं सांगु? (विचार करत) अशीच बोलायचीस तेंव्हा पण. गोंजारत गोंजारत. आम्ही किती तावातावानं बोलायचो. तु मात्र गोड बोलुन आखेरिला आपलं म्हणणं रेटायचीस. आणि, कधी आपलं साधुन घ्यायचीस हे समजायचं पण न्हाई.

(मोबाईल वर एस एम एस आल्याचा रिंग टोन. ‘पाठांतर झालयं काय?’)

अरे च्यायला! (गडबडीने उठतो. बॅगेकडे जातो. स्क्रिप्ट काढतो आणि वाचु लागतो) निघाली रेल गाडी निघाली, झुक झुक झुक, निघाली रेल गाडी, इथल्या घामाचा कोळसा, संस्कृतीची पटरी, चालविती ग्लोबलची छोकरी, निघाली आरोग्याची गाडी, झुक झुक झुक, निघाली आरोग्याची गाडी.

ती कितीदा वाचतोस तेच ते?

तो: पाठच होत न्हाई.

ती: तुच लिहिलतोयस आणि काय पाठ करायला लागतयं?

तो: आम्ही काय प्राध्यापक न्हाई तास भर न बघता भाषणं द्यायला...आणि मी लिहितो ते नाटकातनं सांगायचं म्हंजे फाटायची वेळ येती.

ती: एका जागी बस आणि वाच. पाठ कर. रिहर्सल कर.

तो: यवढा वेळ कुठुन मिळणार!

ती: क्लिनिकला नको जाऊस आज.

तो: (हसत) पेशंट असे घरात बसुन देणारायत व्हय. थोडा उशीर झाला तरी चारदा फ़ोन येणार. आता आज जरा करायचं म्हणतं होतो तर महानगर पालिकेच्या ऑफ़िसर्स बरोबर दुपारी मिटींग आहे. कामगार वसाहतीवरचा आमच्या असोसिएशिनने केलेला रिपोर्ट त्यांच्या बरोबर फायनलाइज करायचाय.

ती: गावच्या उसाभरी करायच्या तर आलं हे सगळं

तो: आमचा गोतावळाय बाईसाहेब...चार तास नोकरी करुन नसतं भागत.

ती: समाजकार्य!...काय का आसेना, सध्या तुमची असोसिएशन एकदम चार्जड झाली असणार न्हाई? आमेरिकेचे लोक काम बघाय येणार...

तो: यस. सगळ्यांना उत्साह आलाय.

ती: पंचवीस तीस लाख तरी मिळतील न्हाई? आणि शिवाय अमेरिका ट्रिप.

तो: येस्स. आमेरिका! चव्हाण काल अमेरिकेला जाताना काय काय कपडे घेउन जायचे याची पण लिस्ट काढतोय म्हनुन सांगत होता.

ती: आमेरिका कॉलिंग! किती उपद्व्याप अमेरिकेसाठी?

तो: नुसतं अमेरिकेसाठी नाही. पंचवीस लाख काय सहज मिळणारायीत?

ती: हे नको सांगुस. तुमची आसोसिएशन गडगंज डॉक्टर लोकांची आहे. पंचवीस लाख आसे जाता- जाता मिळतील.

तो: पण समाजात मान मिळेल, प्रोफेसर बाई. आमेरिकेतल्या कुठल्यातरी फडिंग एजन्सीने मदत केलीय म्हटल्यावर लोकांना काय आभिमान वाटेल. शिवाय, लाहान गावातले प्रश्न आसतात त्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर नोंद होईल. तुमच्या कॉलेजातनं समाजकार्य एन. एस. एस. च्या कार्यक्रमात पथनाट्य बसवता येवढचं नसतं इथं.

ती: तुम्ही ग्रेट बाबा. आम्हाला सर्टिफिकेटसाठी आलेल्या पोरांना घेऊन हे सगळं करायचं आस्तं.

तो: आणि प्राध्यापकांना तर कुठं सामाजिक क्रांती करायची असते!

ती: तुमचं भारीय. भारतातील प्रश्नांसाठी आमेरिकतला पैसा! काही का आसेना रिटर्नस तरी फटाफट मिळतात.

तो: यस. राबा आणि पैसे पाडा.

ती: मस्त! (त्याच्या जवळ जात) हेल्थच्या नांवावर फॉरेन एजन्सीकडुन ग्राऊंड रियालिटीत काम करायला पैसा. (त्याच्या हाताला धरुन गिरकी घेते) आमची माती आमची माणसं. मिस्टर डॉक्टर आनंदराव पाटील, खानदानी मराठा शेतकऱ्याचा मुलगा (ती मुलाखत घेण्याची नक्कल करते) हॅलो, डॉक्टर पाटील, कॉग्रॅच्युलेशन्स फॉर धिस ग्रॅट. भारतातल्या हेल्थविषयक इश्युज वर काम करायला अमेरिका पैसा देतेय. तुम्ही नेक्स्ट विक मधे आमेरिकेला जाताय. आज काय वाटतयं तुम्हाला? मॅडम,थँक्स. यु सी, माझी मुळं इथल्या मातीत आहेत. माझा गांव माझी माणसं मला खुणावत आसतात. आपण त्यांच्यासाठी काहीतरी करायला पाह्यजे या फीलींगमधनं हे काम मी हाती घेतलयं.

तो: (स्वत:शी) गावाकडची माणसं खुष होतील. आमच्या सोसायटीत बोलावतील. सत्कार करतील. किती-किती केलयं त्यांनी माझ्यासाठी. (आठवणीत रमलाय)

शिक्षकांनी मन लावुन, जीव तोडुन शिकवलं म्हणुन इथपर्यंत आलो. तुला मजा वाटलं ऐकुन. भावकीतली माणसं गोरागोमटा दिसायचो म्हणुन मला बामण म्हणुन हाक मारायचे! (हसतो). जायच्या आधी आबांनी हातात हात घेतला आणि आण्णांना सांगितलं, 'आनंदाला लई शिकिव, पाटलाच्या घराण्याचं नांव काढाय पाह्यजे'. (थांबतो) किती कष्ट काढलं आण्णांनी माज्या शिक्षणासाठी. बारक्या बारक्या नोकऱ्या केल्या. सारख्या बदलल्या आमच्या शिक्षणासाठी. नाही तरं असल्या नोकर्या आमच्या घराण्यात कोण केल्या असत्या? आणि कुणाचा सपोर्ट नसताना...

ती: मग तुम्ही शहरातले झाला.

तो: पर्यायच नव्हता.

ती: आसं काही नाही. गावात राहीला नसता तर काही उपाशी नसता राहीला.

तो: अफकोर्स नसतो. खानदानी शेती आणि ती पण बागायती.

ती: जी-जी करणारे लोक आणि डोक्यावर पदर घेणार्या बायका.

तो: ती आमची परंपराय.

ती: (उपहासानं) ही परंपरा?

तो: तुला काय होतय आमचं बघुन?

ती: अरे, तुला काय होतय म्हंजे काय? असली परंपरा?

तो: तुझं सोशॅलॉजी माझ्यावर फ़ेकु नकोस. आणि, फक्त आमची परंपरा काढु नकोस. तुमच्या अंधाऱ्या माजघरांच्या परंपरात बायकांचे आवाज कसे शांत केले जातात हे मला माहितीय.

ती: मला पण माहित्यय.

तो: पण त्याबद्दल बोलली नाहीस कधी?

ती: तु समजुन घ्यायला पाह्यजेस.

तो: आमची पण परंपरा तु समजुन घ्यायला पाहिजेस.

ती:	आमची-तुमची करु नकोस.

तो:	तुच सुरुवात केलीस, आमचं काढुन. आणि तुला काय कमी केलयं? किती स्वातंत्र्य द्यायचं?

ती:	ओह, द ग्रेट मराठा डॉक्टर आनंदराव पाटील मला स्वांतत्र्य देणार!

तो:	नेहमी पदराखालच्या आमच्याच बायका दिसतात!

ती:	दिसतात की तुझे आण्णा. पाया पडायाला गेले तर, 'काय आनंदा, बायको बापया सारखे केस ठेवते' म्हणाले.

तो:	त्यांनी केस कापलेल्या बायका बघितल्या नव्हत्या.

ती:	काय तरी बोलु नको. नोकरीच्या निमित्ताने फिरलेत ते. नेक माणसं बघितलीत. आणि, त्यांच्या मुलींनी पण बॉयकट ठेवलाय.

तो:	ते नंतर. तुझ्या वेळेला माहिती नव्हतं ते. आणि, आईनं सांभाळुन घेतलं की त्यवा.

ती:	(तोऱ्यात) घेतलं की. स्वयंपाक घरात गेल्यावर पदर घे म्हणाल्या...

तो:	तुमचे लोक काई कमी न्हाईत. लग्नानंतर पहिल्याच दिवशी तुझा मामा, 'आमच्यात पन हँडसम लोक होते.' मी म्हणत होतो, सिरियसली सांगत होतो, मी मटन खात न्हाई तर ऐकेचना. परत परत स्वतःचीच टिमकी, 'आम्ही मटन खात नाही' 'आम्ही तिखट जास्त खात नाही'. आमाला काई माहिती नाही मटन कोण माहाग केलय ते!

ती:	मला माहिती होतं हे होणार ते –

तो:	– (उसळत) आरे आमी काय रस्त्यावर राहातोय? येऊन जाऊन आमच्यावर कसलेही शिक्के माराय.

(शांतता)

ती:	(आवाज चढवत) हे होणार म्हणुन मी म्हणत होते आपल्या आपण गाजावाजा न करता लग्न करुया. पण तुलाच खुम-खुमी होती.

तो: पण लग्न झालं की नीट.

ती: काय नीट? आमच्या नातेवाईकांना आवडत नसतानाही मटनाचं जेवण दिलं

तो: जेवण आमच्याकडं होतं आणि ते आमच्या पध्दतीनं द्यायचं होतं.

ती: काय शहाण्णव कुळ दाखवायचं होतं?

तो: स्वतःला प्रोफेसर समजतेस आणि आणि मटनाच्या जेवणावरनं जात काढतेस.

ती: तुच जातीचं सुरु केलंस.

तो: मी? आणि मटनाच्या जेवणाचं काढुन जात कोण दाखवली?

ती: पण, आम्हाला आवडत नव्हतं तर तसलं जेवण कशाला करायचं?

तो: तुमच्यापैकी कोणच मटण खात नाही? खरं सांग?

ती: (ती पॉझ घेऊन बोलते) लग्नात नको होतं खरं...

तो: बंडखोरी करताना थोडी अॅडजस्टमेंट करावी लागणार.

ती: आपल्याला मान्य नसलेली सत्यनारायणाची पुजा घालुन? एरवी कुणी चळवळीतल्या मित्राने भटजीला बोलावुन लग्न लावलेलं ऐकलस तरी वाद घालतोस.

तो: तु पण मॉ देवीच्या आश्रमात जातेस...

ती: मी का जाते याचं कारण तुला माहितीय.

तो: माझी पण कारणं तुला माहितीयत.

(पॉझ)

ती: अरे, पण पत्रिकेवर आमच्याकडच्यांची नावं पण घातली नव्हती. का? कुलकर्णी, देशपांडे ही नावं आली आसती तर तुमचे कुळ डिस्टर्ब झालं असतं?

तो: आमच्या लोकांनी थेट भुमिका तर घेतली आणि नावं नाही टाकली. पण तुम्ही तर पत्रिकाच नाही काढली घाबरुन. का? माझ्याबरोबर लग्न करतेस म्हणुन? तरी, ते सगळे साखरेत घोळुन बोलणार. गोड-गोड बोलुन तुझ्या मावशीनं आंबाबाईला या

म्हटलं. आईला घेऊन गेलो तर... तुझी मावशी तिच्या घरातल्या कामवाल्या बाईला घेऊन बसली होती. पण, माझ्या आईला नाही घेतलं आत. (शांतता) आईला आत जाऊन अंबाबाईचं दर्शन घ्यायचं होतं (थांबतो) बाहेर येऊन ओटी भरुन गेली, च्यायला.

ती: च्यायला काय म्हणतोस...

तो: सॉरी. (थांबतो) पण तुम्ही लोक –

ती: – तुम्ही लोक? तुम्ही लोक म्हंजे काय लावलयसं हे?

तो: तुम्ही लोक म्हंजे तुम्ही लोक.

ती: तुम्ही लोक म्हंजे कोण?

तो: सांगतोच. सोडतो का काय. तुम्ही लोक म्हंजे बामणस.

ती: (ठासुन बोलते) आनंद, या पुर्वी कितीदा तरी बोललोय. जातीबद्दल बोलायचं नाही

तो: माहीतीय. तुच मागचं जुनं पुराणं काढुन उगाळत बसतीस आणि मला बोलायला भाग पाडतीस...

ती: (चढया आवाजात) आता थांबशील?

तो: स्वतावर आलं की मी थांबायचं? आणि तु? मी कशातच न्हाई आशी...धुतल्या तांदळासारखी? आता बोलणार मी. ऐक, खानदानी मराठयाचा मुलगा ब्राह्मणाच्या पोरी बरोबर लग्न करतो म्हंजे त्यांचं पुण्य करत असतो!

ती: ओ, द ग्रेट मराठा. (चढया आवाजात) जातीवंत ब्राह्मणाची मुलगी मराठा पोराबरोबर लग्न करते म्हंजे त्यांच्यावर उपकार करत असते.

तो: किती पिढ्यांपिढ्या त्रास दिलाय तुम्ही...

ती: तुम्ही काय निष्पाप नव्हता...

तो: रक्त खवळतं माझं तुमच्या कर्तुत्वाची यादी वाचताना...

ती: अण्णा परवा-परवापर्यंत गड्यांना मागच्या दाराने चहा द्यायचे..

तो:	तुम्ही तर दुस ऱ्यांची सावली पण जवळ येऊ देत नव्हता...

ती:	तुम्ही जास्त छळलयं

तो:	तुम्ही काई कमी न्हाई.

(अंधार)